ओ+डी-६।२७१५७६

जा. क्र. /उपसं. ३/ ५५८६।डी-१८७।३१

उपसंचालक-३ यांचे कार्यालय, जागतिक बँक प्र
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, बांद्रे[पुर्व] मुंबई नं. ५१
दिनांक:- १८।११।८८

प्रति,
श्री/श्रीमती/कुमारी Vishnu M. Kamde

विषय:-पांचपाखाडी व माजिवडे, ठाणे येथिल विकसित भूखंडाचे वितरण कोड नं. ००७

संदर्भ:-अर्ज क्र. ओडीजीपी २५०२ सोडत क्र. ७२८

महोदय/महोदया,

जागतिक बँकप्रकल्पातंर्गत वरील योजनेच्या सोडतीत आपण यशस्वी असून आपला अर्ज छाननी नंतर भूखंड वितरणास पात्र झाला आहे.

भूखंडाचे वितरणासाठी पात्र झालेल्या अर्जदारांची सहकारी संस्था स्थापन करणे तसेच सहकारी संस्थेच्या उभारणीपूर्वी संस्थेच्या सदस्यांचा परस्पर परिचय होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे घरांच्या बांधणीसाठी अर्थसहाय्य, तांत्रिक मदत, घरबांधणीस प्रत्यक्ष हातभार या सारख्या बाबींची आपणांस माहितीव्हावी या दृष्टीने पात्र ठरतील अश्या संभाव्य अर्जदाराचे मेळावे महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या समाज मंदिर हॉल, गांधी नगर, बांद्रे [पुर्व] मुंबई नं. ५१ येथे दि. ४।१२।८८ -१९८८रोजी घेण्यात येणार आहे. या हॉलकडे येण्यासाठी निरनिराळया ठिकाणाहून २१२, २१३, ३२४, ३१६, २५५, ८७ व ११ या क्रमांकाच्या बसने येता येते.

आपण कृपया ठिक सकाळी १०.२० वाजता या मेळाव्यात अवश्य हजर रहावे अशी विनंती आहे.

मेळाव्यात जातीने हजर असलेल्या पात्र अर्जदारांतून जे अर्जदार खाली दर्शविल्याप्रमाणे सुरवातीच्या रकमेचा भरणा करतील त्यांच्याच सहकारी संस्था या मेळाव्यात स्थापन करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

१]अ [ज्यांनी अर्ज करतांना अनामत रक्कम रु. १००/-भरले] त्यांनी रु. ९४१/-
२]ब [ज्यांनी अर्ज करतांना अनामत रक्कम रु. २००/-भरले] त्यांनी रु. १३७५/-
३]क [ज्यांनी अर्ज करतांना अनामत रक्कम रु. ३००/-भरले] त्यांनी रु. १५४३/-
४]ड [ज्यांनी अर्ज करतांना अनामत रक्कम रु. ५००/-भरले] त्यांनी रु. १३३१/-

आपल्या गटासमोर वर दर्शविलेली रक्कम रु. १३३१/- दिनांक २।१२।८८ या दिनांकापर्यंत बँक ऑफ महाराष्ट्र च्या, गृहनिर्माण भवन शाखा बांद्रे [पुर्व] येथे खाते क्रमांक ३८ मध्ये मुख्य लेखाधिकारी, जागतिक बँक प्रकल्प[चीफ अकाउन्टस ऑफिसर, वर्ल्ड बँक प्रोजेक्ट, अकाउन्ट नं. ३८] यांचे नावे भरून भरणा केल्याची पावती घेऊन स्वत: बैठकीच्या वेळी सादर करावी. या करिता बँक ऑफ महाराष्ट्राची तीन प्रतितील पे स्लिप सोबत जोडली असून बँक कडून या तीन पैकी आपणांस परत मिळालेली कॉउंन्टर फाईल आपण रसीद म्हणून सोबत आणावयाची आहे.

बँकेच्या कामाच्या वेळा रजेचे दिवस वगळून सोमवार ते शुक्रवार सकाळी ११ ते ३ व शनिवार सकाळी ८.३० ते १०.३० अशा आहेत.

मेळाव्यात स्वत: हजर नसलेल्या आणि वर दर्शविलेल्या सुरुवातीच्या रकमा न भरणा-या अर्जदारांचा त्या दिवशी बोलविण्यात येणा-या सहकारी संस्थेत समावेश केला जाणार नाही. आपण या मेळाव्यात जातीने उपस्थित राहिला नाहीत अथवा उपस्थित राहूनही वरील रकमेचा भरणा केला नाही तर आपल्याला करण्यात यावयाचे भूखंडाचे वाटप रद्द केले जाऊ शकेल, याची नोंद घ्यावी.

सहकारी संस्थेच्या निर्मितीचे काम वेगाने व्हावे म्हणुन या उपक्रमाला आपले पूर्ण सहकार्य उपेक्षित आहे. या सर्व कामासाठी सर्व अर्जदारांची उपस्थिती संध्याकाळ पर्यंत सुध्दा आवश्यक राहिल याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासु,

सोबत:- पे स्लिप [तीन प्रतीत]

(सही)

उपसंचालक -३/जा. ब. प्र.
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,
मुंबई नं. ५१

बुक पोस्ट

श्री/श्रीमती/कुमारी विठ्ठु ना. कांदे